प्रकरण : २

## माढा तालुक्याची आर्थिक रूपरेषा

अ) भौगोलीक स्थान :

सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेयला असून त्याचे भौगोलीक स्थान १७$^0$ , १० ते १८$^0$ , ३२ उत्तर अक्षांश व ७४$^0$, ४२ ते ७६$^0$, १५ पूर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे. जिल्हयाच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद हे जिल्हे, पूर्वेस उस्मानाबाद जिल्हा व आंध्रप्रदेश राज्य, दक्षिणेस सांगली जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे जिल्हा आहे.


माढा तालुका सोलापूर जिल्हयाच्या उत्तरेला असून सोलापूरपासून माढा हे तालुक्याचे ठिकाण ६५ कि.मी. आहे. माढा तालुक्याच्या उत्तरेस बार्शी व परांडा (उस्मानाबाद जिल्हयातील) तालुका, पूर्वेस मोहोळ व बार्शी तालुका, पश्चिमेस करमाळा तालुका व पुणे जिल्हा तर दक्षिणेस पंढरपूर व माळशिरस तालुका आहे.

ब) क्षेत्रफळ आणि प्रशासकीय विभाग :

माढा तालुका हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील तीन नंबरचा तालुका आहे. माढा तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १५४४.९ चौ. कि.मी. असून ते सोलापूर जिल्हयाच्या एकूण क्षेत्रफळाच्या १०.४१ टक्के आहे. त्यापैकी १०.३६ टक्के (१५३८.४ चौ. कि.मी.) ग्रामीण व ०.०५ टक्के (६.५ चौ.कि.मी.) नागरी क्षेत्रफळ आहे. माढा तालुक्याच्या एकूण क्षेत्रफळांपैकी ९९.५७ टक्के क्षेत्रफळ ग्रामीण आहे. तर ०.४३ टक्के क्षेत्रफळ नागरी आहे.

क) नदया :

माढा तहसीलमध्ये भीमा आणि सीना या दोनच नदया आहेत. भीमा नदी ही सहयाद्री पर्वतावरील भीमाशंकर तालुका, खेड जिल्हा, पुणे येथून उगम पावून आग्नेयेकडे पुणे व अहमदनगर या जिल्यातून वहात येते. या नदीच्या पाणलोट क्षेत्रात डाव्या बाजूस करमाळा तालुक्याचा पश्चिमेकडील अर्धा भाग येवून माढा तालुक्यातील पश्चिम भागातून वहात जावून पंढरपूर तहसीलमध्ये प्रवेश करते. या नदीवर


सोलापूर जिल्हा.
उत्तर
सुची :-
माढा तालुका
करमाळा
बार्शी
माळशिरस
मोहोळ
पंढरपूर
सोलापूर
सांगोला
मंगळवेढा
अक्कलकोट
नगर जिल्हा
पुणे जिल्हा
सातारा
उस्मानाबाद
जिल्हा
कर्नाटक
सांगली
उ.
द.
प्रमाण १" = १० मैल.

तालुक्याच्या पश्चिम भागात उजनी या ठिकाणी धरण बांधण्यात आले आहे. तर सीना नदी ही उस्मानाबाद जिल्ह्यातून वहात येवून माढा तहसीलच्या पूर्व भागातून वहात जावून मोहोळ तहसीलमध्ये प्रवेश करते. या नदीवर निमगांव या ठिकाणी बंधारा बांधण्याचे काम सुरु आहे.

ड) हवामान आणि पर्जन्य :

तपमान :

सोलापूर जिल्हयातील कमाल तपमान ४०.३ सेंटीग्रेड व किमान तपमान १६.७ सेंटीग्रेड आहे. माढा तालुक्यातील कमाल तपमान जिल्ह्यातील कमाल तपमानापेक्षा जास्त असून ते ४०.४ सेंटीग्रेड आहे. तर किमान तपमान जिल्यातील किमान तपमानापेक्षा कमी असून ते ११.१ सेंटीग्रेड असल्याची नोंद जेऊर केंद्रात झाली आहे.

पर्जन्य :

पर्जन्यमानाच्या दृष्टीने संपूर्ण सोलापूर जिल्हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात येतो. मान्सूनचा कालावधी जूनच्या दुस-या पंधरवडयापासून सप्टेंबर अखेर असतो. जिल्ह्यातील वार्षिक सरासरी (नॉर्मल) पर्जन्यमान ५८४ मि.मी. आहे. पर्जन्यमानाची सन. १९५३ पासूनची आकडेवारी पाहता असे दिसून येते कि, दर वर्षीच्या पर्जन्यमानामध्ये बरीच तफावत असून तो आवश्यकतेपेक्षा कमी आहे.


क) लोकसंख्या :

१९७१ ते १९८१ या कालावधीत माढा तालुक्याची लोकसंख्या १,९२,७१० पासून ते २,०८,००० पर्यंत वाढली. या दशकातील लोकसंख्येची निव्वळ वाढ १५,२९० नी झालेली आहे. या कालावधीत एकूण लोकसंख्या ७.९३ टक्क्यांनी वाढली आहे. १९७१ च्या जणगणनेनुसार माढा तालुक्याची लोकसंख्येची घनता दर चौ. कि.मी. ला १२५ होती. ती १९८१ च्या जणगणनेनुसार दर चौ. कि.मी. ला १३४ झाली.

इ) शेती :

शेती हा माढा तालुक्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. माढा तालुक्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ७९.७९ टक्के लोकसंख्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे

# माढा तालुका.



उस्मानाबाद जिल्हा.
करमाळा तालुका.
बार्शी तालुका.
पुणे जिल्हा
उजनी
भीमा नदी
टेंभुर्णी
कुर्डूवाडी
ब्रॉड गेज
माढा
सीना नदी

माढा तालुक्याच्या जमिन वापराचा तपशील कोष्टक-१ मध्ये दिला आहे.

कोष्टक – १

माढा तालुक्यातील जमिनीचा वापर

( हेक्टरमध्ये )

| तपशील | १९७४ – ७५ | १९८० – ८१ |
|---|---|---|
| १) एकूण भौगोलीक क्षेत्र | १,५२,६०० | १,५२,६०० |
| २) जंगल व्याप्त क्षेत्र | १,७०० | १,७०० |
| ३) शेतीस उपयूक्त नसलेले क्षेत्र | ६,८०० | ६,६०० |
| ४) निव्वळ पिकाखालील क्षेत्र | १,२६,५०० | १,२८,४०० |
| ५) लागवडीलायक क्षेत्र | – – | १,३८,६०० |
| ६) एकापेक्षा जास्त पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र | २५,७०० | २७,९०० |
| ७) एकूण लागवडीखालील क्षेत्र | १,२८,४०० | १,३४,६७० |

संदर्भ : तहसील कार्यालय माढा
व जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर १९७५-७६व१९८१-८२.

एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी जंगलव्याप्त क्षेत्र या कालावधीत कायम असून ते १७०० हेक्टर आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राशी जंगलव्याप्त क्षेत्राचे प्रमाण १.११ टक्क्यावर स्थिर आहे. या कालावधीत निव्वळ पिकाखालील क्षेत्र १९०० हेक्टरने वाढले आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राशी निव्वळ लागवडीखाली असलेल्या क्षेत्राच्या प्रमाणात १९७४-७५ ते १९८०-८१ या कालावधीत ८२.८९ टक्क्यापासून ८४.१४ टक्क्यापर्यंत वाढ झाली. याच कालावधीत एकापेक्षा जास्त पिकाखालील क्षेत्र २२०० हेक्टरने वाढले आहे. तर एकूण लागवडीखालील क्षेत्र ६२७० हेक्टरने वाढले आहे.

ग) पिकाचा आकृतीबंध :

माढा तालुक्याच्या पिकाच्या आकृतीबंधात ज्वारीच्या क्षेत्राचे महत्वाचे स्थान आहे. १९७४-७५ या वर्षी ज्वारीच्या लागवडीखालील क्षेत्र ६३,७८८ हेक्टर होते. निव्वळ लागवडीखालील क्षेत्राशी हे प्रमाण ५०.४२ टक्के होते. १९८०-८१ या वर्षी ज्वारीखालील क्षेत्र १,०५,३७९ हेक्टर झाले. याचे निव्वळ लागवडीखालील क्षेत्राशी

असलेले प्रमाण ८२.०७ टक्के होते. या कालावधीत ज्वारीच्या लागवडीखालील क्षेत्र ४१,५९१ हेक्टरने वाढले आहे.

कोष्टक - २

माढा तालुक्यातील पिकाचा आकृतिबंध

(हेक्टरमध्ये)

| पिके | १९७४ - ७५ | १९८० - ८१ |
|---|---|---|
| अ) तृणधान्ये | ७२,०९१ | १,१६,२०७ |
| १) ज्वारी | ६३,७८८ | १,०५,३७९ |
| २) गहू | २,६०५ | ५,११० |
| ३) बाजरी | ३,८१२ | ३,४९७ |
| ४) भात | २८२ | २१० |
| ५) इतर तृणधान्य | १,६०४ | २,०११ |
| ब) कडधान्ये | ३९,७९१ | ११,४४७ |
| १) हरभरा | ३,५२० | ५,१२५ |
| २) तूर | ३,८५९ | ३,६४५ |
| ३) हुलगा | १७,५९२ | २,३९५ |
| ४) इतर कडधान्य | १४,८२० | २८२ |
| क) गळीत धान्य | १३,४९६ | ५,२६२ |
| १) करडई | १०,३७५ | २,४५२ |
| २) शेंगा | २,११५ | २,१८० |
| ३) इतर गळीत धान्य | १,००६ | ६३० |
| ड) इतर | ३,१२२ | १,७५४ |
| १) ऊस | ६९१ | ७३० |
| २) मसाल्याचे पदार्थ | १,१५४ | १,०२४ |
| ३) इतर पिके | १,२७७ | - - |
| एकूण | १,२८,४०० | १,३४,६७० |

संदर्भ : तहसील कार्यालय माढा. व जिल्हा सामाजिक आर्थिक समालोचन सोलापूर १९७५-७६ व १९८४-८५.

कोष्टकावरून असे दिसते कि, पिकाच्या आकृतिबंधात तृणधान्याच्या पिकाचे महत्वाचे स्थान आहे १९७४-७५ या वर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्राशी हे प्रमाण ५६.१४ टक्के होते तर १९८०-८१ या वर्षी हे प्रमाण ८६.२९ टक्के झाले या कालावधीत या प्रमाणात ३०.१५ टक्केनी वाढ झाली आहे.

तृणधान्याखालोखाल पिकाच्या आकृतिबंधात कडधान्याची पिके महत्वाची आहेत. १९७४-७५ या वर्षी कडधान्याचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी असलेले प्रमाण ३०.९८ टक्के होते. हे प्रमाण १९८०-८१ या वर्षी ८.५० टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात २२.४८ टक्के घट झालेली दिसते.

तसेच गळीतधान्ये व इतर पिकांचे लागवडीखालील क्षेत्रही १९७४-७५ च्या मानाने १९८०-८१ मध्ये घटलेले दिसून येते. १९७४-७५ या वर्षी गळीतधान्याचे एकूण लागवडीखालील क्षेत्राशी प्रमाण १०.५१ टक्के होते. ते १९८०-८१ या वर्षी ३.९० टक्के झाले. या कालावधीत या प्रमाणात ६.६१ टक्के घट झाली. तर इतर पिकांचे १९७४-७५ या वर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्राशी प्रमाण २.४३ टक्के होते. ते १९८०-८१ या वर्षी १.३० टक्के झाले. १९७४-७५ या वर्षीच्या मानाने १९८०-८१ या वर्षी एकूण तृणधान्याचे लागवडीखालील क्षेत्र वाढलेले दिसून येते.

तालुक्यातील ज्वारी, गहू, बाजरी, हरभरा, तूर, करडई शेंगा इ. महत्वाची पिके आहेत.

घ) <u>ओलीता खालील क्षेत्र</u>:

माढा तालुक्यात भीमा आणि सीना या दोन नद्या असून माढा तालुक्याचा पश्चिम भाग उजनी-जलाशयामुळे ओलीताखाली आलेला आहे. तर सीना नदीमुळे पुर्वेकडील भागाला कांही प्रमाणात जलसिंचन होते आहे. ही नदी पावसाळ्यात वहात असून उन्हाळ्यात कोरडी असते.

ओलीताखालील क्षेत्रातील माढा तालुक्यातील बदल कोष्टकामध्ये स्पष्ट केला आहे.

कोष्टक - ३

माढा तालुक्यातील ओलिताखालील क्षेत्र

(हेक्टरमध्ये)

| वर्षे | ओलीता खालील क्षेत्र | निव्वळ लागवडी-खालील क्षेत्र | निव्वळ लागवडीखालील क्षेत्राशी ओलीताखालील क्षेत्राचे शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९७४-७५ | १६,५२० | १,२६,५०० | १३.०५ |
| १९८४-८५ | २८,३६५ | १,३०,३३३ | २१.७६ |

संदर्भ : तहसील कार्यालय माढा.

या कोष्टकावरून असे दिसते कि, तालुक्याच्या ओलीताखालील क्षेत्रा १९७४-७५ च्या मानाने १९८४-८५ या वर्षी ११,८४५ हेक्टर क्षेत्रानी वाढ घडून आली. निव्वळ लागवडीखालील क्षेत्रातही ३८३३ हेक्टरनी वाढ घडून आली. लागवडीखालील क्षेत्रात ओलीताखालील क्षेत्राचे प्रमाण वाढण्याचे कारण उजनी धरणाचे पाणी कॅनॉलद्वारे व बॅकवॉटरद्वारे शेतीला पूरविण्याची सोय झाली.

तालुक्यात एकूण १९८७-८८ या वर्षी ७१८३ विहिरींची संख्या आहे. या द्वारेही शेतीला पाणीपुरवठयाची सोय होते आहे.

च) वहातुकीच्या सुविधा :

तालुक्यातील रस्ते मोठया शहरांसी जोडले गेले आहेत. पुणे, सोलापूर, हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र. ९ तालुक्यातून जात आहे. त्याच बरोबरच रेल्वे हे महत्वाचे वहातुकीचे साधन आहे. ब्रॉडगेज व नॅरोगेज या दोन्ही मार्गे वहातूक होते. रेल्वेचे तालुक्यात कुर्डूवाडी येथे मोठे स्थानक आहे.

माढा तालुक्यात १९८७-८८ या वर्षापर्यंत एकूण ७९५ कि.मी. लांबीचे सर्व प्रकारचे रस्ते असून त्यापैकी २१६ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे डांबरीकरण झालेले

9570
A

होते. ४२३ कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे खडीकरण झालेले होते तर १५६ कि.मी. लांबीचे रस्ते मुरूमापासून तयार केले होते.

त्याशिवाय माढा तालुक्यात ११४ कि.मी. लांबीचा रेल्वेमार्ग आहे.

छ) <u>सहकारी संस्था :</u>

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० मधील कलम ८१ नुसार १९८८ पर्यंत माढा तालुक्यात नोंदणी झालेल्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्था २८७ होत्या.

यापैकी प्राथमिक सहकारी पतपुरवठा करणा-या संस्था ८१ होत्या. एकूण सहकारी संस्थाशी प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचे प्रमाण २८.२१ टक्के होते. दूध सहकारी संस्थांची संख्या ५६, मजूर सहकारी संस्थांची संख्या ३५, औद्योगिक सहकारी संस्थांची संख्या १४, पगारदार सहकारी संस्था ११ आणि सहकारी पाणीपुरवठा संस्था १४ आहेत. मच्छिमार सहकारी संस्थांची संख्या ७, ग्राहक भांडार सहकारी संस्थाची संख्या ५, शेती सहकारी संस्थांची संख्या ४ तर कृषी-बि-बीयाणे सहकारी संस्थांची संख्या ३ एवढी आहे.

याशिवाय कुक्कुटपालन सहकारी संस्था आणि वहातूक सहकारी संस्था यांच्या प्रत्येकी २ संस्था आहेत. बलुतेदार सहकारी संस्था, सहकारी खरेदी-विक्रीसंघ, औद्योगिक सहकारी वसाहत, हातमाग सहकारी संस्था, सुपरव्हीजन यूनियन आणि अर्बन सहकारी बँक यांच्या प्रत्येकी एक संस्था आहे.

तसेच तालुक्यात मागासवर्गीयांसाठी जगदंबा सहकारी सूतगिरणी सुरू झालेली आहे. यावर संपूर्ण सेवकवर्ग हा मागासवर्गीयच आहे.